# प्रकरण 2

# मानव संसाधने

# प्रकरण 2: मानव संसाधने

***भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार आरोग्य सेवा संस्थेतील मनुष्यबळाच्या गरजेचे निर्धारण करण्यासाठी राज्य शासनाने तफावतीचे विश्लेषण केले नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत प्राथमिक आणि द्वितीय आरोग्यसेवा क्षेत्रात डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी संवर्गातील कमतरता अनुक्रमे 22 टक्के, 35 टक्के आणि 29 टक्के होती. राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकारक्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांची 42 टक्के पदे रिक्त होती. तर सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत स्त्री रुग्णालयाच्या बाबतीत डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता अनुक्रमे 23 टक्के, 19 टक्के आणि 16 टक्के होती. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिकारक्षेत्रातील डॉक्टर/तज्ञ डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी संवर्गातील कमतरता अनुक्रमे 37 टक्के, 35 टक्के आणि 44 टक्के होती. राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिकारक्षेत्रातील डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी संवर्गातील एकूण कमतरता अनुक्रमे 27 टक्के, 35 टक्के आणि 31 टक्के होती.***

***आयुष महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका व निम-वैद्यकीय कर्मचारी यामध्ये अनुक्रमे 21 टक्के, 57 टक्के आणि 55 टक्के कमतरता होती.***

***राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिकारक्षेत्रातील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये अनुक्रमे 23 टक्के आणि 44 टक्के कर्मचा-यांची कमतरता होती.***

***निवडलेल्या सात जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात कमतरता आढळून आली.***

## 2.1 मानव संसाधनांचे नियोजन व मूल्यमापन

जागतिक आरोग्य संघटनेने प्रकाशित केलेल्या जागतिक आरोग्य अहवाल, 2006 मध्ये आरोग्य मनुष्यबळ किंवा आरोग्य कर्मचाऱ्यांची अशी व्याख्या केली आहे की सर्व लोक जे अश्या कृतींमध्ये गुंतलेले आहेत ज्यांचा प्राथमिक हेतू आरोग्य वृद्धिंगत करणे हा आहे. या मनुष्यबळात भिषक (फिजिशियन), परिचारिका, औषध-निर्माता (फार्मासिस्ट) आणि दंतचिकित्सक यासारख्या वैद्यकीय कर्मचारी वर्गाचा तसेच व्यवस्थापन आणि सहाय्यक कर्मचारी[13] यांचाही समावेश आहे.

रुग्णालयांमध्ये दर्जेदार आरोग्य सेवा पुरविणे हे प्रामुख्याने मनुष्यबळाच्या विशेषत: डॉक्टर, परिचारिका, निम-वैद्यकीय व इतर सहाय्यक कर्मचारी यांच्या पर्याप्त उपलब्धतेवर अवलंबून असते. भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके, 2012 नुसार

---

13 सहाय्यक कर्मचारी वर्गामध्ये व्यवस्थापक, रुग्णवाहिका चालक आणि लेखापाल जे थेट सेवा देत नाहीत परंतु आरोग्य सेवा प्रणालीच्या कार्यासाठी आवश्यक आहेत अशा लोकांचा समावेश आहे.

आवश्यक मनुष्यबळाचे निर्धारण करण्यासाठी तफावतीचे विश्लेषण (गॅप-ॲनालिसिस) करणे आवश्यक होते. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र शासनाने असे कोणतेही तफावतीचे विश्लेषण केले नव्हते. तफावतीच्या विश्लेषणा-अभावी मनुष्यबळाच्या भविष्यातील गरजेचे मूल्यमापन झाले नाही हे डॉक्टर, परिचारिका, निम-वैद्यकीय कर्मचारी या संवर्गातील मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे स्पष्ट होते.

सह संचालक, आरोग्य सेवा, आयुक्तालय यांनी सांगितले (नोव्हेंबर 2023) की, सुविधा स्तरावर मनुष्यबळाच्या तफावतीचे विश्लेषण सुरू आहे.

## 2.2 आरोग्य सेवा संस्थांमधील मनुष्यबळ

सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग आणि महानगरपालिकांच्या अधिकारक्षेत्रातील राज्यातील आणि निवडलेल्या जिल्ह्यांमधील चाचणी-तपासणी केलेल्या आरोग्य सेवा संस्थांमधील मनुष्यबळाची उपलब्धता यावर पुढील परिच्छेदांमध्ये चर्चा केली आहे. नियमित भरती व्यतिरिक्त, महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कंत्राटी नियुक्त्या देखील केल्या होत्या.

### 2.2.1 मनुष्यबळाची उपलब्धता

जागतिक आरोग्य परिषदेने डॉक्टर-लोकसंख्या गुणोत्तर 1:1,000 आणि प्रति डॉक्टर तीन परिचारिका आणि सुईणी (मिडवाईज) अशा निकषांची शिफारस केली आहे. जागतिक आरोग्य परिषदेने शिफारस केलेल्या डॉक्टर-लोकसंख्येच्या निकषानुसार महाराष्ट्रात 1,25,411[14] डॉक्टरांची आवश्यकता आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या अभिलेख्यांनुसार मार्च 2022 पर्यंत राज्यात 1,71,282 डॉक्टरांची नोंदणी झाली होती. तद्नुसार, जागतिक आरोग्य संघटनेच्या 1:1,000 च्या मानकाच्या तुलनेत महाराष्ट्रातील डॉक्टर-लोकसंख्येचे प्रमाण 1:732 आहे. अशाप्रकारे, राज्यात जागतिक आरोग्य परिषदेच्या निकषांपेक्षा जास्त (37 टक्क्यांनी अधिक) डॉक्टर आहेत.

राज्यात 1,71,282 नोंदित डॉक्टरांसाठी आवश्यक 5,13,846[15] परिचारिकांच्या तुलनेत 2,18,159 परिचारिकांची[16] नोंदणी झाली आहे. यावरून जागतिक आरोग्य परिषदेच्या निकषांच्या तुलनेत महाराष्ट्रात परिचारिकांची 58 टक्के कमतरता असल्याचे दिसून आले. जागतिक आरोग्य परिषदेच्या निकषांच्या तुलनेत राज्यातील डॉक्टर आणि परिचारिकांची उपलब्धता **तक्ता 2.1** मध्ये दर्शविली आहे.

---

14 डॉक्टरांची आवश्यक संख्या= अनुमानित लोकसंख्या 12,54,11,000/1,000 (जुलै 2022 रोजीची अनुमानित लोकसंख्या).

15 मार्च 2022 पर्यंत नोंदणीकृत डॉक्टर्स (1,71,282) x 3 परिचारिका प्रति डॉक्टर = 5,13,846 परिचारिका.

16 महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या अभिलेख्यांनुसार.

**तक्ता 2.1: जागतिक आरोग्य परिषदेच्या निकषांच्या तुलनेत राज्यात डॉक्टर आणि परिचारिकांची उपलब्धता**

| प्रवर्ग | राज्याची अनुमानित लोकसंख्या (2022) | जागतिक आरोग्य परिषदेच्या निकषांनुसार आवश्यक मनुष्यबळ | राज्यातील नोंदणीकृत डॉक्टर/ परिचारिका | जास्त (+)/कमी (-) (*टक्केवारीत*) |
|---|---|---|---|---|
| डॉक्टर | 12,54,11,000* | 1,25,411 | 1,71,282# | (+) 45,871 (*37*) |
| परिचारिका | | 5,13,846 | 2,18,159** | (-) 2,95,687 (*58*) |

*स्त्रोत:* सार्वजनिक आरोग्य विभागाची सर्वसमावेशक टिप्पणी (मार्च 2022)*

*# महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती (मार्च 2022 पर्यंत)*

*** महाराष्ट्र परिचर्या परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती (मार्च 2022 पर्यंत)*

## 2.3 सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत मनुष्यबळ

### 2.3.1 प्राथमिक व द्वितीय आरोग्य सेवा संस्थांमध्ये मनुष्यबळाची उपलब्धता

राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांनी सादर (मे 2023) केलेल्या जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, उप-जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उप-केंद्र या मधील डॉक्टर, परिचारिका व निम-वैद्यकीय संवर्गातील मंजूर पदे व कार्यरत कर्मचाऱ्यांचा विदा लेखापरीक्षणाने संकलित करून त्यांचे एकत्रीकरण केले. भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके ही खाटांच्या क्षमतेनुसार जिल्हा रुग्णालये, उप-जिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण रुग्णालयांसाठी डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी यांच्या संख्येची शिफारस करते. भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एक डॉक्टर, तीन परिचारिका आणि दोन निम-वैद्यकीय कर्मचारी आणि उप-केंद्रासाठी एक परिचारिका यांची सुद्धा शिफारस करते.

मंजूर संख्याबळाच्या तुलनेत भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी यांच्या आवश्यकतेची तुलना केल्यावर असे निदर्शनास आले की, भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसारच्या डॉक्टरांच्या आवश्यकतेपेक्षा मंजूर संख्याबळ 15 टक्क्यांनी (तक्ता 2.2) कमी आहे. तथापि, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी यांचे मंजूर संख्याबळ भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसारच्या आवश्यकतेपेक्षा जास्त होते. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आणि द्वितीय आरोग्य सेवेतील मंजूर पदांच्या तुलनेत कार्यरत पदांची तुलना केली असता डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी संवर्गातील संख्याबळात अनुक्रमे 22 टक्के, 35 टक्के आणि 29 टक्के कमतरता असल्याचे निदर्शनास आले. डॉक्टर, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी यांचा संवर्ग-निहाय तपशील **तक्ता 2.2** मध्ये दर्शविला आहे व जिल्हा-निहाय तपशील अनुक्रमे **परिशिष्ट 2.1 अ, 2.1 ब व 2.1 क** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.2: भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके व मंजूर संख्याबळ यांच्या तुलनेत सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेल्या प्राथमिक आणि द्वितीय आरोग्य सेवा संस्थांमधील मे 2023 पर्यंत मनुष्यबळाची उपलब्धता**

| संवर्ग | भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार आवश्यकता | मंजूर संख्याबळ | भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसारच्या आवश्यकतेच्या तुलनेत कमी (-)/ जास्त (+) यांची टक्केवारी | कार्यरत कर्मचारी | कमतरता | मंजूर संख्येच्या तुलनेत कमतरता टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| डॉक्टर्स | 8,668 | 7,381 | (-) 15 | 5,765 | 1,616 | 22 |
| परिचर्या कर्मचारी | 24,114 | 26,578 | (+) 10 | 17,314 | 9,264 | 35 |
| निम-वैद्यकीय कर्मचारी | 11,550 | 15,809 | (+) 37 | 11,282 | 4,527 | 29 |
| **एकूण** | 44,332 | **49,768** | **(+) 12** | **34,361** | **15,407** | **31** |

*स्त्रोत: जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सादर केलेली माहिती*

**तक्ता 2.2** व्यतिरिक्त महाराष्ट्रात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत 19 स्त्री रुग्णालये कार्यरत होती. या 19 स्त्री रुग्णालयांमध्ये उपलब्ध मनुष्यबळाचा तपशील **तक्ता 2.3** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.3: सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत स्त्री रुग्णालयांमधील मनुष्यबळाची उपलब्धता**

| प्रवर्ग | मंजूर संख्याबळ | कार्यरत कर्मचारी | कमतरता | मंजूर संख्याबळाच्या तुलनेत कमतरतेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| डॉक्टर्स | 291 | 224 | 67 | 23 |
| परिचर्या कर्मचारी | 1,011 | 822 | 189 | 19 |
| निम-वैद्यकीय कर्मचारी | 270 | 228 | 42 | 16 |
| **एकूण** | **1,572** | **1,274** | **298** | **19** |

*स्त्रोत: संबंधित स्त्री रुग्णालयांच्या वैद्यकीय अधिक्षकांनी सादर केलेली माहिती*

### 2.3.2 सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकारक्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांची उपलब्धता

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी सादर केलेल्या माहितीनुसार, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकारक्षेत्रात तज्ञ डॉक्टरांची[17] कमतरता होती. मार्च 2023 पर्यंत तज्ञ डॉक्टरांच्या विविध संवर्गातील रिक्त पदे **तक्ता 2.4** मध्ये दर्शविली आहेत. जिल्हा-निहाय स्थिती **परिशिष्ट 2.2** मध्ये दर्शविली आहे.

भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके खाटांच्या क्षमतेनुसार जिल्हा रुग्णालये, उप-जिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण रुग्णालये यासाठी तज्ञ डॉक्टरांच्या संख्याबळाची शिफारस सुद्धा करते..

मंजूर पदांच्या तुलनेत भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार तज्ञ डॉक्टरांच्या आवश्यकतेची तुलना केल्यास असे निदर्शनास आले की, भारतीय सार्वजनिक आरोग्य

---

[17] तज्ञ डॉक्टर हे फक्त वेतन श्रेणी एस-20 आणि एस-23 मध्येच आहेत.

मानकांनुसार कान नाक घसा, क्ष-किरण तज्ञ, शल्यचिकित्सक आणि भिषक (फिजिशियन) संवर्ग जिथे मंजूर पदांची कमतरता अनुक्रमे 52 टक्के, 10 टक्के व 66 टक्के होती ते वगळता बहुतेक संवर्गात तज्ञ डॉक्टरांच्या मंजूर पदांची संख्या आवश्यकतेपेक्षा जास्त होती जे **तक्ता 2.4** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.4: मार्च 2023 पर्यंत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकारक्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांची उपलब्धता**

| अ.क्र. | संवर्ग | भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार आवश्यकता | मंजूर पदे | भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांनुसार आवश्यकतेच्या तुलनेत कमी (-)/ जास्त (+) यांची टक्केवारी | कार्यरत कर्मचारी | रिक्त पदे | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बालरोगतज्ञ. | 523 | 686 | (+) 31 | 425 | 261 | 38 |
| 2 | स्त्री रोग तज्ञ व प्रसूतितज्ञ. | 526 | 751 | (+) 43 | 442 | 309 | 41 |
| 3 | भूलतज्ञ. | 504 | 867 | (+) 72 | 435 | 432 | 50 |
| 4 | नेत्ररोग तज्ञ. | 122 | 170 | (+) 39 | 120 | 50 | 29 |
| 5 | अस्थि शल्यचिकित्सक | 122 | 196 | (+) 61 | 163 | 33 | 17 |
| 6 | कान नाक घसा तज्ञ. | 122 | 58 | (-) 52 | 40 | 18 | 31 |
| 7 | क्ष-किरण तज्ञ. | 122 | 110 | (-) 10 | 57 | 53 | 48 |
| 8 | मानसोपचारतज्ञ. | 21 | 126* | (+) 500 | 38 | 88 | 70 |
| 9 | विकृतीशास्त्र/रोगनिदान तज्ञ. | 50 | 73 | (+) 46 | 53 | 20 | 27 |
| 10 | छाती आणि क्षयरोग | उपलब्ध नाही | 42 | - | 11 | 31 | 74 |
| 11 | त्वचारोग तज्ञ. | 38 | 52 | (+) 37 | 19 | 33 | 63 |
| 12 | शल्यचिकित्सक | 504 | 171 | (-) 66 | 80 | 91 | 53 |
| 13 | भिषक (फिजिशियन) | 507 | 172 | (-) 66 | 90 | 82 | 48 |
| 14 | न्यायवैद्यक औषधशास्त्र (फॉरेन्सिक मेडिसिन) | 9 | 19 | (+) 111 | 19 | 0 | 0 |
| 15 | रक्त संक्रमण अधिकारी | उपलब्ध नाही | 37 | - | 27 | 10 | 27 |
| 16 | प्रतिबंधात्मक आणि सामाजिक चिकित्सा | उपलब्ध नाही | 112 | - | 101 | 11 | 10 |
| | **एकूण** | | **3,642** | | **2,120** | **1,522** | **42** |

*स्त्रोत : संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी सादर केलेली माहिती*

*उपलब्ध नाही: भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांमध्ये उपलब्ध नाही*

* *महाराष्ट्रात तीन प्रादेशिक मनोरुग्णालये आहेत*

**तक्ता 2.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकारक्षेत्रातील तज्ञ डॉक्टरांच्या विविध संवर्गातील एकूण 42 टक्के पदे रिक्त होती. मानसोपचार तज्ञ, छाती व क्षयरोग, त्वचारोग तज्ञ आणि शल्यचिकित्सक या संवर्गातील रिक्त पदे 50 टक्क्यांहून अधिक होती.

**परिशिष्ट 2.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे 35 जिल्ह्यांतील तज्ञांची एकूण रिक्तता तीन टक्के (जालना) ते 74 टक्के (रत्नागिरी) यादरम्यान होती. तसेच, 13 जिल्ह्यांतील पदांची रिक्तता 50 टक्क्यांहून अधिक होती.

### 2.3.3 राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळ

राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानातील योजनांच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी मनुष्यबळाची नेमणूक करण्यात आली होती. राज्यात मार्च 2023 पर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी तत्त्वावरील मनुष्यबळाची उपलब्धता **तक्ता 2.5** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 2.5: मार्च 2023 पर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मनुष्यबळाची उपलब्धता**

| संवर्ग | मंजूर पद | कार्यरत कर्मचारी | रिक्त पदे | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| तज्ञ डॉक्टर | 1,755 | 794 | 961 | 55 |
| वैद्यकीय अधिकारी | 5,785 | 3,907 | 1,878 | 32 |
| प्रशासकीय कर्मचारी | 8,349 | 6,666 | 1,683 | 20 |
| समूह आरोग्य अधिकारी | 9,884 | 8,196 | 1,688 | 17 |
| निम-वैद्यकीय कर्मचारी | 6,522 | 5,349 | 1,173 | 18 |
| परिचारिका | 18,602 | 15,462 | 3,140 | 17 |
| वर्ग-"ड" कर्मचारी | 1,479 | 536 | 943 | 64 |
| **एकूण** | **52,376** | **40,910** | **11,466** | **22** |

*स्त्रोत : राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई यांनी सादर केलेली माहिती*

**तक्ता 2.5** मध्ये दर्शविल्याप्रमाणे विविध संवर्गातील पदांची एकूण रिक्तता 17 टक्के (समूह आरोग्य अधिकारी व परिचारिका) ते 32 टक्के (वैद्यकीय अधिकारी) यादरम्यान होती. तज्ञ डॉक्टरांच्या संवर्गातील रिक्त पदांची टक्केवारी 55 टक्के होती.

## 2.4 वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत मनुष्यबळ

राष्ट्रीय वैद्यकीय आयोग निकष (वार्षिक एमबीबीएस प्रवेशासाठी किमान आवश्यकता नियमावली) 2020 असे निर्धारित करते की, वार्षिक एमबीबीएस प्रवेशाच्या आधारे वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिक्षक/डॉक्टर यांचे संख्याबळ निश्चित करावे.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोग निकषांनुसार वैद्यकीय महाविद्यालयांमधील शिक्षक/डॉक्टरांची आवश्यकतेच्या तुलनेत मंजूर संख्याबळाची तुलना केल्यास असे निदर्शनास आले की, राष्ट्रीय वैद्यकीय आयोग निकषानुसार 2,809 शिक्षक/डॉक्टर्सच्या आवश्यकतेच्या तुलनेत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिकारक्षेत्रातील शिक्षक/डॉक्टर्स यांचे मंजूर संख्याबळ 3,722 होते. अशाप्रकारे, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत शिक्षक/डॉक्टर्स यांची उपलब्धता आवश्यकतेपेक्षा जास्त होती.

तथापि, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मे 2023 पर्यंत शिक्षक/डॉक्टर्स, परिचारिका आणि निम-वैद्यकीय कर्मचारी या संवर्गातील मंजूर पदे व कार्यरत पदे यांची सादर केलेल्या माहितीनुसार, संबंधित संवर्गात अनुक्रमे 37 टक्के, 35 टक्के,

44 टक्के कमतरता होती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालय-निहाय शिक्षक/डॉक्टर परिचारिका व निम-वैद्यकीय कर्मचारी या संवर्गातील मंजूर पदे, कार्यरत कर्मचारी व कमतरता यांचा तपशील **परिशिष्ट 2.3** मध्ये दर्शविला आहे.


वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सांगितले (जानेवारी 2023) की अधिष्ठाता, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहाय्यक प्राध्यापक अश्या 1,207 पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नियुक्तीसाठी 785 पात्र उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र शासनाकडे पाठविलेली होती.

तथापि, पदे रिक्त होती ही वस्तुस्थिती कायम राहते.

## 2.5 सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या अंतर्गत डॉक्टरांचे मंजूर संख्याबळ आणि उपलब्धता यातील प्रादेशिक विषमता

राज्यभरातील लोकसंख्येच्या तुलनेत सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या अंतर्गत डॉक्टरांचे मंजूर संख्याबळ आणि उपलब्धता यात मोठी तफावत असल्याचे लेखापरीक्षणात आढळून आले जे **नकाशा 2.1** व **नकाशा 2.2** मध्ये दर्शविले आहे.


**नकाशा 2.1: लोकसंख्येच्या तुलनेत सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत डॉक्टरांच्या जिल्हा-निहाय मंजूर पदांच्या संख्याबळाचे गुणोत्तर**




*स्त्रोत : संचालक, आरोग्य सेवा व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारावर नकाशा तयार करण्यात आला.*

**नकाशा 2.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यात 3,461 लोकसंख्येसाठी डॉक्टरांचे एक मंजूर पद तर पालघर[18] जिल्ह्यात 18,235 लोकसंख्येसाठी डॉक्टरांचे एक मंजूर पद असे गुणोत्तर होते.

**नकाशा 2.2: लोकसंखेच्या तुलनेत सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत डॉक्टरांच्या जिल्हा-निहाय उपलब्धतेचे गुणोत्तर**




*स्त्रोत : संचालक, आरोग्य सेवा व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारावर नकाशा तयार करण्यात आला*

**नकाशा 2.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यात 5,578 लोकसंख्येमागे एक डॉक्टर उपलब्ध असे गुणोत्तर होते तर जळगाव जिल्ह्यात[19] 25,517 लोकसंख्येसाठी एक डॉक्टर उपलब्ध असे होते.

## 2.6 मनुष्यबळाच्या कमतरतेतील प्रादेशिक विषमता

सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत आरोग्य सेवा संस्थांनी सादर केलेल्या माहितीनुसार, राज्यात डॉक्टरांची 27 टक्के कमतरता, परिचारिकांची 35 टक्के कमतरता, आणि निम-वैद्यकीय कर्मचारी यांची

---


18 मुंबई शहर, मुंबई उपनगर, नाशिक, पुणे व ठाणे या पाच जिल्ह्यांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा संस्थांमधील डॉक्टरांची लक्षणीय उपलब्धता लक्षात घेऊन मुंबई शहर, मुंबई उपनगर, नाशिक, पुणे व ठाणे हे जिल्हे तुलना करताना वगळण्यात आले.

19 मुंबई शहर, मुंबई उपनगर, नाशिक, पुणे व ठाणे या पाच जिल्ह्यांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा संस्थांमधील डॉक्टरांची लक्षणीय उपलब्धता लक्षात घेऊन मुंबई शहर, मुंबई उपनगर, नाशिक, पुणे व ठाणे हे जिल्हे तुलना करताना वगळण्यात आले.

31 टक्के कमतरता होती. जिल्हा-निहाय विश्लेषणात मनुष्यबळाच्या कमतरतेतील प्रादेशिक विषमता निदर्शनास आली.

**(अ)** डॉक्टरांची कमतरता जळगाव (49 टक्के), सातारा (47 टक्के) आणि यवतमाळ (44 टक्के) या जिल्ह्यांत सर्वाधिक होती, तर डॉक्टरांची न्यूनत्तम कमतरता नाशिकमध्ये नऊ टक्के, चंद्रपूर व ठाण्यात 10 टक्के आणि जालना व पालघर जिल्ह्यात 12 टक्के होती जे **नकाशा 2.3** मध्ये दर्शविले आहे.


**नकाशा 2.3: डॉक्टरांची जिल्हा-निहाय कमतरता (टक्केवारीत)**




*स्त्रोत : संचालक, आरोग्य सेवा व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारावर नकाशा तयार करण्यात आला*

**(ब)** परिचारिकांची कमतरता अहमदनगर (60 टक्के), जळगाव (54 टक्के) आणि नंदुरबार (52 टक्के) या जिल्ह्यांत सर्वाधिक होती, तर नाशिक आणि पालघर (चार टक्के) जिल्ह्यांत ही कमतरता सर्वात कमी होती जे **नकाशा 2.4** मध्ये दर्शविले आहे.


**नकाशा 2.4: परिचारिकांची जिल्हा-निहाय कमतरता (टक्केवारीत)**




*स्त्रोत : संचालक, आरोग्य सेवा व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारावर नकाशा तयार करण्यात आला.*

**(क)** निम-वैद्यकीय कर्मचारी यांची कमतरता सिंधुदुर्ग (49 टक्के), वर्धा (48 टक्के) आणि जालना (47 टक्के) या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक होती, तर सर्वात कमी आठ टक्के ही नाशिक जिल्ह्यात होती, जे **नकाशा 2.5** मध्ये दर्शविले आहे.

**नकाशा 2.5: निम-वैद्यकीय कर्मचारी यांची जिल्हा-निहाय कमतरता (टक्केवारीत)**




*स्त्रोत : संचालक, आरोग्य सेवा व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारावर नकाशा तयार करण्यात आला.*

## 2.7 निवडलेल्या जिल्ह्यांमधील महानगरपालिकांतर्गत मनुष्यबळ

मार्च 2022 पर्यंत निवडलेल्या जिल्ह्यांतील महानगरपालिकांच्या अधिकारक्षेत्रातील आरोग्य सेवा संस्थांमधील मनुष्यबळाची स्थिती **तक्ता 2.6** मध्ये सारांशित केली आहे आणि संवर्ग-निहाय कमतरतेचा तपशील **परिशिष्ट 2.4** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 2.6: चाचणी-तपासणी केलेल्या महानगरपालिकांमधील आरोग्य सेवा संस्थांमध्ये मनुष्यबळाची उपलब्धता**

| अ.क्र. | महानगरपालिकेचे नाव | मंजूर पदांचे संख्याबळ | कार्यरत कर्मचारी | रिक्त पदे | रिक्त पदांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमरावती | 85 | 24 | 61 | 72 |
| 2 | छत्रपती संभाजीनगर | 383 | 261 | 122 | 32 |
| 3 | चंद्रपूर | 70 | 70 | 0 | 0 |
| 4 | जळगाव | 240 | 115 | 125 | 52 |
| 5 | कोल्हापूर | 460 | 325 | 135 | 29 |
| 6 | बृहन्मुंबई महानगरपालिका (चाचणी-तपासणी केलेली रुग्णालये) | 10,158 | 7,015 | 3,143 | 31 |
| 7 | नांदेड | 177 | 75 | 102 | 58 |
| 8 | पुणे | 1,672 | 810 | 862 | 52 |
| 9 | पिंपरी-चिंचवड | 839 | 583 | 256 | 31 |
| | **एकूण** | **14,084** | **9,278** | **4,806** | **34** |

*स्त्रोत :संबंधित महानगरपालिकांनी सादर केलेली* माहिती

**तक्ता 2.6** मध्ये दर्शविल्याप्रमाणे निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये 14,084 मंजूर पदांच्या तुलनेत 9,278 पदे भरण्यात येऊन, विविध संवर्गातील 4,806 पदे (34 टक्के) रिक्त होती. सर्वाधिक कमतरता ही अमरावती महानगरपालिकेत (72 टक्के) होती.

**परिशिष्ट 2.4** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, वैद्यकीय अधिकारी (वर्ग I आणि II), निम-वैद्यकीय कर्मचारी आणि परिचर्या कर्मचारी या पदांच्या रिक्त जागा अनुक्रमे 43 टक्के, 49 टक्के आणि 18 टक्के होत्या.

## 2.8 ट्रॉमा केअर सेंटरमधील मनुष्यबळाची स्थिती

### 2.8.1 सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ट्रॉमा केअर सेंटरमधील मनुष्यबळाची स्थिती

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी 109 ट्रॉमा केअर सेंटरच्या बांधकामासाठी मान्यता (1997 ते 2017 दरम्यान) दिली. सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार, 109 ट्रॉमा केअर सेंटरपैकी केवळ 73 ट्रॉमा केअर सेंटर बांधण्यात आली होती, त्यापैकी राज्यातील 26 जिल्ह्यांमध्ये 60 ट्रॉमा केअर सेंटर कार्यरत होती.

सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार, या 60 ट्रॉमा केअर सेंटरमध्ये डिसेंबर 2022 पर्यंत भूलतज्ञ, अस्थि शल्यचिकित्सक, वैद्यकीय अधिकारी आणि परिचारिका इत्यादी संवर्गातील 852 मंजूर पदांच्या तुलनेत कार्यरत कर्मचारी 657 असून 195 पदे (23 टक्के) रिक्त होती. लेखापरीक्षणात असेही निदर्शनास आले की, डिसेंबर 2022 पर्यंत पाच ट्रॉमा केअर सेंटर[20] अस्थि शल्यचिकित्सक यांच्याशिवाय कार्यरत होती.

### 2.8.2 वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत ट्रॉमा केअर सेंटरमधील मनुष्यबळाची स्थिती

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत असलेल्या 109 ट्रॉमा केअर सेंटरव्यतिरिक्त वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत कोल्हापूर, नागपूर आणि पुणे येथे स्तर II ची ट्रॉमा केअर सेंटर होती.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार पुणे आणि कोल्हापूर येथे प्रत्येक ट्रॉमा केअर सेंटरसाठी 37 पदे आणि ट्रॉमा केअर सेंटर, नागपूरसाठी 86 पदे मंजूर करण्यात आली होती. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की या 37 मंजूर पदांपैकी ट्रॉमा केअर सेंटर, पुणे मध्ये केवळ 11 पदे आणि ट्रॉमा केअर सेंटर, कोल्हापूर मध्ये सहा पदे भरण्यात आली होती. ट्रॉमा केअर सेंटर, नागपूरमध्ये 86 मंजूर पदांच्या तुलनेत 73 पदे भरण्यात आली होती.

अशाप्रकारे, पुणे, कोल्हापूर आणि नागपूर येथील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये अनुक्रमे 70 टक्के, 84 टक्के आणि 15 टक्के मनुष्यबळाची कमतरता होती. या ट्रॉमा केअर सेंटरमध्ये मनुष्यबळाची एकूण कमतरता 44 टक्के होती.

## 2.9 आयुष महाविद्यालये व रुग्णालयांतील मनुष्यबळाची स्थिती

मे, 2023 पर्यंत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणाखाली 16[21] आयुष महाविद्यालये आणि रुग्णालये होती. या 16 महाविद्यालये आणि रुग्णालयांमधील मनुष्यबळाची स्थिती **तक्ता 2.7** मध्ये दर्शविली आहे.

---

[20] (i) ग्रामीण रुग्णालय भोकर, जिल्हा नांदेड (ii) उप-जिल्हा रुग्णालय, कळंबणी, जिल्हा रत्नागिरी (iii) उप-जिल्हा रुग्णालय, पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ (iv) जिल्हा रुग्णालय, पुणे व (V) जिल्हा रुग्णालय, सातारा.

[21] सात आयुष महाविद्यालये; या सात आयुष महाविद्यालयांना संलग्नित सात रुग्णालये; पुणे येथील 20 खाटांचे एक आयुर्वेद रुग्णालय; मुंबई येथील एक शासकीय होमिओपॅथी रुग्णालय.

**तक्ता 2.7: मे 2023 पर्यंत आयुष महाविद्यालये आणि रुग्णालयांमधील मनुष्यबळाची स्थिती**

| संवर्ग | मंजूर पदे | कार्यरत कर्मचारी | रिक्त पदे (टक्के) |
|---|---|---|---|
| डॉक्टर | 402 | 317 | 85 (21) |
| परिचारिका | 329 | 142 | 187 (57) |
| निम-वैद्यकीय कर्मचारी | 117 | 53 | 64 (55) |
| इतर | 948 | 535 | 413 (44) |
| **एकूण** | **1,796** | **1,047** | **749 (42)** |

*स्त्रोत : संचालक, आयुष यांनी सादर केलेली माहिती*

विदाच्या विश्लेषणातून खालील गोष्टी निदर्शनास आल्या:

- सर्व 16 आयुष महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता होती. रिक्त पदांची टक्केवारी सहा टक्के (शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, बारामती) आणि 100 टक्के (जळगाव, बारामती, पुणे आणि मुंबई येथील चार आयुष रुग्णालये) यादरम्यान होती. उत्तरात संचालक, आयुष यांनी नमूद (डिसेंबर 2023) केले की, डॉक्टरांच्या नियुक्तीसाठी भरती नियमावलीचा मसुदा शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून जळगाव व बारामती येथील आयुष रुग्णालयांचे कामकाज आयुष महाविद्यालयातील प्राध्यापक व पदव्युत्तर विद्यार्थींद्वारे केले जात आहे.
- नऊ आयुष रुग्णालयांमध्ये परिचारिकांची कमतरता होती. रिक्त पदांची टक्केवारी 25 टक्के (आर. ए. पोदार रुग्णालय, मुंबई) ते 87 टक्के (शासकीय आयुर्वेद रुग्णालय, बारामती) यादरम्यान होती.
- 14 आयुष महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये निम-वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता होती. रिक्त पदांची टक्केवारी 14 टक्के (शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नांदेड) ते 100 टक्के (बारामती व जळगाव जिल्ह्यातील तीन आयुष महाविद्यालये आणि या आयुष महाविद्यालयांना संलग्न तीन रुग्णालये) यादरम्यान होती.

शासकीय आयुष महाविद्यालय व रुग्णालयांमधील मंजूर पदे, कार्यरत कर्मचारी व रिक्त पदांचा तपशील **परिशिष्ट 2.5** मध्ये दर्शविला आहे.

***शिफारस 1: शासनाने लोकांना इष्टतम व गुणात्मक आरोग्य सेवा देण्याची सुनिश्चिती करण्यासाठी आरोग्य क्षेत्रातील रिक्त पदे कालबद्ध पद्धतीने भरावी. शासनाने भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांमध्ये शिफारस केल्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत मंजूर संख्याबळ सुद्धा वाढवावे.***

## 2.10 मनुष्यबळाची भरती

सार्वजनिक आरोग्य विभागात वर्ष 2016-17 ते 2021-22 दरम्यान 2,730 डॉक्टरांची भरती करण्यात आली होती. त्यापैकी 54 टक्के (1,479) डॉक्टर वर्ष 2021-22 दरम्यान भरती करण्यात आले होते. वर्ष 2019-20 आणि 2020-21 दरम्यान भरती करण्यात आली नव्हती.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात वर्ष 2016-17 ते 2021-22 दरम्यान 576 डॉक्टरांची भरती करण्यात आली होती. वर्ष 2019-20 आणि 2020-21 दरम्यान भरती करण्यात आली नव्हती. तसेच, वर्ष 2021-22 मध्ये डॉक्टरांच्या भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीच्या आधारावर वर्ष 2022-23 आणि 2023-24 दरम्यान 1,063 डॉक्टरांची भरती करण्यात आली. वर्ष 2018-19 दरम्यान 328 परिचारिकांची भरती करण्यात आली तर वर्ष 2016-17 ते 2021-22 दरम्यान 23 निम-वैद्यकीय कर्मचारींची भरती करण्यात आली.

## 2.11 प्रशिक्षण कार्यक्रम

वैद्यकीय अधिकारी, तज्ञ डॉक्टर, निम-वैद्यकीय कर्मचारी आणि माता व बाल आरोग्य क्षेत्रात काम करणा-या सहाय्यक कर्मचाऱ्यांचे (लिंक वर्कर्स) ज्ञान व कौशल्य वाढविण्यासाठी नियमित प्रशिक्षण व क्षमतावर्धन उपक्रम आवश्यक असतात. सर्व संवर्गांचे नियतकालिक अंतराने प्रशिक्षण हा भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांचा आवश्यक घटक आहे.

राष्ट्रीय स्तरावर, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातर्फे विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. महाराष्ट्रात, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील एक नोडल सर्वोच्च प्रशिक्षण संस्था[22] आणि सात प्रादेशिक प्रशिक्षण संस्था[23] वैद्यकीय आणि निम-वैद्यकीय कर्मचा-यांना प्रशिक्षण देत आहेत. राज्यात 33 जिल्ह्यांत सुसज्ज जिल्हा प्रशिक्षण केंद्रे आणि 23 जिल्ह्यांत रुग्णालय प्रशिक्षण केंद्रेसुद्धा कार्यरत आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत 2017-18 ते 2021-22 या कालावधीत निवडलेल्या नऊ[24] जिल्ह्यांपैकी सात जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विविध प्रशिक्षणांचा तपशील **तक्ता 2.8** मध्ये दर्शविला आहे.

22 सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर.

23 अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नागपूर नाशिक, पुणे आणि ठाणे येथील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे.

24 मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यांत कोणतेही प्रशिक्षण आयोजित करण्यात आले नाही.

**तक्ता 2.8: आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा-निहाय प्रशिक्षणाची स्थिती**

| जिल्हा | नियोजित प्रशिक्षण | प्रशिक्षण देण्यात आले | जास्त (+)/ कमी (-) | प्रशिक्षणातील कमतरता (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| अमरावती | 110 | 92 | (-) 18 | 16 |
| छत्रपती संभाजीनगर | 226 | 140 | (-) 86 | 38 |
| चंद्रपूर | 251 | 249 | (-) 2 | 1 |
| जळगाव | 376 | 346 | (-) 30 | 8 |
| कोल्हापूर | 2,151 | 2,106 | (-) 45 | 2 |
| नांदेड | 723 | 201 | (-) 522 | 72 |
| पुणे | 1,904 | 1,597 | (-) 307 | 16 |

*स्त्रोत: निवडलेल्या जिल्ह्यांचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सादर केलेली माहिती*

**तक्ता 2.8** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, प्रशिक्षण देण्यातील कमतरता ही एक टक्का (चंद्रपूर) ते 72 टक्के (नांदेड) या दरम्यान होती.